महाराष्ट्र पोलीस

# Office of the Supdt. Of Police, Wardha

## पोलीस अधिक्षक कार्यालय, वर्धा.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, सिव्हील लाईन, वर्धा ४४२००१ दुरध्वनी क्रमांक ०७१५२ - २३२५००/२३२५१९/२३२५०५ फॅक्स ०७१५२ - २३०५२१

Email - sp. wardha@mahapolice.gov.in  sp.wardha@rediffmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रति,

मा.पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कमांकः पोअव/प्रलि–आस्था/पोलीस भरती–2021/लेखी परिक्षा पात्र उमे./2023 100 वर्धा दिनांक 23/02/202_

**संदर्भ** :– कमांक प्रशि/पो.शि भरती/रिक्त पदे माहिती/132/2020–3690 दिनांक 06/12/2022

**विषय** :– पोलीस शिपाई तसेच पोलीस शिपाई चालक पोलीस भरती– 2021 लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये सादर आहे की, वर्धा जिल्हा पोलीस दलाकरीता पोलीस भरती सन–2021 चे भरती प्रकियेमध्ये पोलीस शिपाई तसेच चालक पोलीस शिपाई पदाकरीता आलेल्या उमेदवारांचे कागदपत्र, शारिरीक तपासणी व मैदाणी चाचणी दिनांक 02/01/2023 ते 09/01/2023 या कालावधीत घेण्यात आली. सदर चाचणीत उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसर मैदाणी चाचणीत 50 टक्के पेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून 1:10 या प्रमाणात मिळालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार त्यांच्या जातीनिहाय प्रवर्गात उपलब्ध जागानुसार व समांतर आरक्षण निकषानुसार पोलीस शिपाई या पदाकरीता एकुण 915 उमेदवार लेखी परिक्षेकरीता पात्र झाले आहे.

तसेच पोलीस शिपाई चालक या पदाकरीता 366 उमेदवार हे वाहन कौशल्य चाचणी करीता पात्र झालेले असून सदर उमेदवारांची वाहन कौशल्य चाचणी दिनांक 21/02/2023 ते 23/02/2023 या कालावधीत प्रादेशिक वाहन प्रशिक्षण केंद्र, इसापूर तहसिल देवळी, जि. वर्धा येथे घेण्यात आली असून 366 उमेदवारांपैकी 345 उमेदवार वाहन कौशल्य चाचणीकरीता हजर झाले आहे. त्यापैकी एकत्रीत किमान 40 टक्के गुण मिळवणारे एकुण 283 उमेदवार लेखी परिक्षेसाठी पात्र झालेले आहे.

करीता माहितीस सविनय सादर

23/2

(नूरूल हसन) भा.पो.से
पोलीस अधीक्षक, वर्धा